# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२०००

**अपिलार्थी श्री. नामदेवराव आहिरे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**

उप मुख्य अधिकारी (पणन) यांचे कार्यालय, मुंबई मंडळ,
पहिला मजला, म्हाडा इमारत, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**

उप मुख्य अधिकारी (पणन) यांचे कार्यालय, मुंबई मंडळ,
पहिला मजला, म्हाडा इमारत, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.११.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित (प्रतिनिधी)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०२.२०२४ | - | १२.०४.२०२४ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०७.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. २१.०२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार मुंबई महामंडळामार्फत मे ते ऑगस्ट २०२३ मध्ये म्हाडाच्या घरासाठी लॉटरी काढण्यात आली होती. त्यानंतर लॉटरीमध्ये जे काही विजेत्यांनी घर न घेण्यासाठी सरेंडर केले आहे. अशा लोकांची नावे व अर्ज क्रमांक देण्याबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थीनी दि. १२.०४.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी ईमेलद्वारे लेखी निवेदन आयोगास सादर करुन विनंती केली की, ते वैद्यकीय कारणास्तव आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत. तरी पुढची तारीख मिळण्याची त्यांनी विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

..२/-

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : १९.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ